| MHKO160000642016 | रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ११३/२०१७ मधील निशाणी क्रमांक १६ वर आदेश |
| --- | --- |

०१. वादीने हा अर्ज दि. ०१/०७/१९८६ रोजीचा दस्त इम्पांऊंड करण्यासाठी दिला आहे.

०२. वादीचे कथन आहे की सदरचा दावा गट नं. ५३२ क्षेत्र ०.२६ आर, आकार रू.०.१३ पैसे मधील ०.०२ आर याबाबत खरेदीपत्र पूर्ण करून देणेबाबत मागणीकरीता केलेला आहे. सदरचे करारपत्र प्रतिवादीने दि.०१/०७/१९८६ रोजी दिलेले आहे व संचकारपूर्व रक्क्म त्यावेळीच स्विकारलेली आहे व पूर्णतः कब्जा दिलेला आहे. वादी यांना सदरचा कब्जा ०.०७ आर चा दिलेला असून वादी यांना फक्त ०.०२ आर चेच खरेदीपत्र पूर्ण करून घेणेचे आहे.

०३. प्रतिवादीचे कैफियत व नोटीसीतील मजकुरावरून ते खरेदीपत्र पूर्ण करून देणेस टाळाटाळ करीत आहेत. प्रतिवादीने पैसे घेवूनही जागा एन.ए. केली नाही म्हणून खरेदीपत्र पूर्ण करून दिले नव्हते व करता आले नाही. सबब, सदरचा दावा अनरजिस्टर्ड दि.०१/०७/१९८६ चे करारपत्राचा असलेने सदरचा दस्त पुराव्यात वाचणे गरजेचे आहे व त्यासाठी वादी यांनी मुळ दस्त हजर केलेला आहे. सदरचा दस्त हा प्रतिवादी यांनी लिहून दिलेला आहे. त्यामुळे सदरचा दस्त इंपाउंड करणेकामी मे. मुद्रांक जिल्हाधिकारी, कोल्हापुर बावडा रोड यांचेकडे सर्व चार्जेस भरणेस वादी तयार आहेत व त्यामुळे वादी व प्रतिवादी यांना मुळ वाद सोडविणेस मदत होणार आहे. तसेच त्यामुळे शासनाचा महसुल देखिल बुडणार नाही. त्यामुळे वादी यांनी पुराव्यात सर्व गोष्टींचा उहापोह होण्यासाठी संबंधित ॲथॉरिटीकडून सदरचा दि.०१/०७/१९८६ रोजीचा दस्त इंपाउंड होवून मिळणेविषयी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादीने या अर्जास म्हणणे न दिल्यामळे सदरचा अर्ज त्यांचे म्हणण्याविना चालविण्यात येत आहे.

०५. वादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, कागदपत्रांचे अवलोकन केले, माझ्या विचारार्थी खालील मुददे निघतात. त्यावरील माझा निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| अ. क्रं. | विचारार्थ निघालेले मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींचा दि. ०१/०७/१९८६ रोजीचा दस्त इम्पाऊंड करावा का ? | होकारार्थी. |
| २ | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणेमिमांसा

### मुददा क्रमांक १ करीता

०६.        बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट, १९५८ चे कलम ३४ प्रमाणे अपु-या स्टॅँम्पवर नोंदविलेला दस्त पुराव्यात वाचता येत नाही. बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट, १९५८ चे कलम ३३ अन्वये अपुरा स्टॅम्प जोडलेला दस्ता सरकारी कर्मचा-यांपुढे पुराव्यात वाचण्यासाठी आला तर सदरचा दस्त इम्पांउंड करुन घेण्याची जबाबदारी त्या अधिका-यांवर आहे. वादींनी सदरचा मुळ दस्त या कामी हजर केलेला आहे. सदरचा दस्त इम्पाउंड करण्यासाठी लागणारा सर्व खर्च वादी करण्यास तयार आहेत. सदरचा दस्त खरा किंवा खोटा, सदरचा दस्त प्रतिवादीने करुन दिला होता किंवा नाही हे पुराव्याअंती ठरवता येईल. सदरचा दस्त पुराव्यात वाचता येण्यासाठी इम्पाउंड करणे न्यायोचित होईल. म्हणून मी मुददा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देत आहे व मुददा क्रमांक २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादीनी हजर केलेला दि. ०१/०७/१९८६ रोजीचा दस्त इम्पांउंड करण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी, मध्यवर्ती शासकीय कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर यांच्याकडे पाठविण्यात यावेत.

०३. मुळ दस्ताची न्यायालयाच्या अधीक्षकांकडून तपासणी करुन साक्षांकित प्रत अभिलेखावर ठेवण्यात यावी.

०४. सदरचा दस्त इम्पांउंड करण्याचा खर्च वादींनी करावा.

Digitally signed by
AMOL SHRIRAM
SHINDE
Date: 2022.10.04
11:07:29 +0530

(अमोल श्रीराम शिंदे )

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दिनांक –०३/१०/२०२२                    मलकापूर-शाहुवाडी